# कशाळकर यांचे बहारदार गायन

प्रसिद्ध अभिनेत्री-नृत्यांगना हेमामालिनी यांचे भरत नाट्यम शैलीतील नृत्य रंगतदार ठरणार ही अपेक्षा असतेच. ती परवा पूर्ण झाली. हेमामालिनी यांची कन्या ईशा देओल हिचे ओडिसी शैलीतील नृत्यहि बहारदार ठरले. ४७व्या सवाई गंधर्व महोत्सवाच्या पहिल्या रात्री या दोघींचे नृत्य आणि उल्हास कशाळकर यांचे बहारदार गायन याच उल्लेखनीय बाबी ठरल्या.

कार्यक्रमाची सुरुवात तुकाराम दैठणकर यांच्या सनई वादनाने झाले त्यांना संबळसाथ धनंजय पंडित यांची व स्वरपेटी साथ त्यांचे गुरु महादेव दैठणकर व बंधू नीतिन दैठणकर यांनी केली. दैठणकर यांनी राग यमन घेतला. सुरुवातीला विलंबित गायकी अंगाने झाली; परंतु नंतर मात्र त्यास हलक्या धुनीचा बाज आला. थोडासा कणसुरपणाहि जाणवला. यानंतर पद्मा देशपांडे यांचे गायन झाले. त्या कै. सवाई गंधर्व यांच्या नातसून होत. त्या सोलापूरच्या असून, प्रथम त्यांनी दिगंबरबुवा कुलकर्णी यांच्याकडे व लग्नानंतर हिराबाई बडोदेकर आणि सरस्वती राणे यांच्याकडे शिक्षण घेतले.



प्रसिद्ध नृत्यांगना हेमामालिनी आणि त्यांची कन्या ईशा यांनी सवाई गंधर्व संगीत महोत्सवात गुरुवारी रात्री पंडित भीमसेन जोशी यांचे आशिर्वाद घेतले.



उल्हास कशाळकर

पद्मा देशपांडे यांनी राग श्यामकल्याणमधील 'जियो मेरे लाल' हा ख्याल घेतला. त्यांचा आवाज पहाडी व सुरेल आहे, परंतु गायकीमध्ये किराणाशैली फारशी दिसून येत नाही. क्रमवार न्यास व बढत तारषड्ज ही किराणागायकीची वैशिष्ट्ये आहेत. श्रीमती देशपांडे यांनी तारसप्तक ढाळले व ख्यालाची बिलंपतहि लवकर उरकली. श्यामकल्याणमध्ये शुद्ध सारंगचा तीरोभाव उत्तम साधता येतो. तसे दोन मध्यम स्पष्ट जाणवले नाहीत. त्यांच्या आवाजाला फिरत मात्र चांगली आहे व द्रुतगतीच्या ताना त्यांनी तयारीने घेतल्या. कांही बोल-आलापहि श्रवणीय होते. ख्यालानंतर देशपांडे यांनी पिलू व गारामिश्रित दादरा घेतला. पेटीच्या साथीला डॉ. अरविंद थत्ते व तबल्याला भरत कामत होते.

## स्वप्नसुंदरीचे नृत्य

रंगमंचावर यानंतर विराजमान झाली स्वप्नसुंदरी आणि नृत्यांगना श्रीमती हेमामालिनी. एकटी नव्हे तर आपली सुंदर, नृत्यकुशल कन्या ईशा देओल हिच्यासह. प्रथम ईशा देओल हिने ओडिसी नृत्य सादर केले.

**सवाई गंधर्व महोत्सव-१**

ओडिसी ही प्रांतीय शैली भरतनाट्यम्‌पासून उत्क्रांत होऊन दुभंगी (म्हणजे शरीर दोन ठिकाणी वाकवणे) हे भरतनाट्यम्‌चे वैशिष्ट्य आहे, तर त्रिभंगी म्हणजे शरीर तीन ठिकाणी वाकवून नृत्य करणे, हे ओडिसीचे वैशिष्ट्य आहे. ईशाचे गुरु रवींद्र अतीबुद्धि यांनी तिला पेटीची व गायनाची साथ केली. निवेदन चक्रवर्ती यांचे इंग्रजीत होते. ते चागले होते; परंतु सर्व लोकाना ते कळले नाही. ईशाने मंगलाचरण सादर करून जगन्नाथ म्हणजे श्रीकृष्ण व इतर देवांची वंदना नृत्यात सादर केली. मोहक रूप, डौलदार बांधा व लयबद्ध नृत्याच्या हालचाली हे तिचे वैशिष्ट्य होते. मंगलाचरणनंतर ईशाने पल्लवी सादर केली. तीत खमाज राग होता व गायन दीपक चव्हाण यांनी केले.

ईशानंतर तिची गुरु व माता हेमामालिनी यांनी भरतनाट्यम् सादर केले. हेमामालिनी या प्रथम दिल्लीच्या त्रिवेणी कला केंद्रात शिकल्या असून, नंतर त्यांनी अनेक दाक्षिणात्य गुरु केले. मीरा, सावित्री, दुर्गा असे नृत्याचे विविध कार्यक्रम त्यांनी बसवले आहेत.

हेमामालिनी यांनी प्रथम शिववंदना सादर करून, नंतर रागमालिका व तालमालिकांमध्ये शिवाची विविध रूपे दाखविली. या वेळी आकित देसाई



मालिनी राजूरकर

यांचे गायन फार सुरेख झाले. यमन, कलावती, शिवरंजनी, मालकस असे विविध राग त्यांनी घेतले. सध्याच्या भरतनाट्यम् नृत्यांगनांचे हे वैशिष्ट्य सांगता येईल की, मूळ कर्नाटक संगीत सोडून उत्तर हिंदुस्थानी संगीतात त्या विविध रचना त्या दाखवीत आहेत. रागमालिकानंतर हेमामालिनीने भैरवी रागात तुलसीदासकृत हनुमानस्तुति नृत्यांकित केली.

खरा रंग भरला तो यानंतर हेमामालिनी आणि ईशा देओल यांच्या भरतनाट्यम् व ओडिसीच्या जुगलबंदीने. त्यांनी दोन्ही नृत्यांची परंपरा आपापल्या शैलीत दर्शविली. शेवटी जयदेवच्या अष्टपदीने त्यांनी नृत्याची सांगता केली. एक अप्रूप असा हा नृत्यविलास झाला.

## समाधान देणारे गायन

या संगीत रजनीतील सर्वात बहारदार गायन कुणाचे झाले असेल तर ते पं. उल्हास कशाळकर यांचे. वडिलांकडे शिक्षण घेतल्यानंतर उल्हास कशाळकर यांनी पं. राम मराठे व पं. गजाननबुवा जोशी यांच्याकडे शिक्षण घेतले. त्यांच्या गायकीत आग्रा व ग्वाल्हेर या गायकीचा संगम तर आहेच; पण किराणा घराण्याचा सुरेलपणा व आर्त-आलापी त्यांनी उचलली आहे. त्यांनी जोगकंस रागातील 'सुघर बर पायो' हा ख्याल इतका परिपूर्ण गायला की बस्स! मधुर बिलंपत, तार षड्जाचा आनंद, बोल आलाप, बोलताना, गमकताना, जबड्याताना, उकारयुक्त ताना, देखावे, मींड यांचे सुरेख कॅलिडोस्कोप त्यांनी गायनात दाखवले. जोडीला पं. सुरेश तळवलकर यांची अप्रतिम तबलासाथ व डॉ. अरविंद थत्ते यांची सर्व गायकी प्रतिबिंबित करणारी सुरेल संवादिनी एक मणिकांचनयोगच होता! जोगकंसच्या उत्कृष्ट मेजवानीनंतर पं. कशाळकरांनी बहार रागातील 'कलियनके संग' आणि 'बन बन बोलरिया' या द्रुत बंदिनी पेश केल्या. त्याहि उत्तम वठल्या. सवाई गंधर्व महोत्सवातील हे